# यशस्वी होण्यासाठी उद्योगातील जोखीम पत्करा : कुलगुरू डॉ. फडणवीस




उद्योगविश्वात यशस्वी झालेल्या उद्योजकांची जीवनगाथा पाहिल्यास लक्षात येते की त्यांनी या क्षेत्रात जोखीम पहिल्यांदा पत्करली म्हणून ते पुढच्या आयुष्यात यशस्वी झाले, म्हणून विद्यार्थ्यांनो जोखीम पत्करायला शिका, असा सल्ला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी दिला.

संगमेश्वर कॉलेज वाणिज्य व व्यवस्थापन विभाग, उद्योजकता विकास मंडळ यांच्यावतीने आयोजित 'स्टुडंट सिनर्जी एक्स्पो २०२०' या उद्यमोदय प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. याप्रसंगी मंचावर संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी, प्राचार्य शोभा राजमान्य, कॉमर्स विभागाच्या उपप्राचार्य डॉ. वंदना पुरोहित, कामिनी गांधी उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाल्या, कॉलेज जीवनात अशा उद्योग विश्वाशी निगडित स्पर्धांचे आयोजन केल्याने मुलांचा दृष्टिकोन तयार होतो. व्यक्तिमत्त्व घडते. निकोप स्पर्धेत आपल्याला वावरता येते. मार्केटिंग शिकता येते. स्पर्धात्मक वातावरणाचा सामना करण्याचे बळ मिळते. म्हणून विद्यार्थ्यांनी हे बाहेरचे जग अनुभवावे. हे ज्ञान तुमच्या भावी जीवनासाठी उपयोगी पडेल, असा विश्वास वाटतो.

संपूर्ण प्रदर्शनाच्या मुख्य प्रवेशद्वाराचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी वेगवेगळ्या खाद्यपदार्थांचा आस्वाद घेत फेरफटका मारला. गड्डा यात्रेच्या निमित्ताने आलेल्या स्टॉलधारकांचे मान्यवरांनी कौतुक केले. त्यानंतर उद्घाटन सत्र झाले.

उद्घाटन सत्रात प्रारंभी कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर वंदना पुरोहित यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रा. गौरव जुदगार यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सत्कारानंतर कुलगुरूंनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीमधील प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संतोष पवार यांनी केले तर आभार प्रा. राजकुमार खिलारे यांनी मानले.